# ई-निविदा पेपर

## भाड्याने वाहने पुरविणे सन २०२४ ते २०२६

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा)
राजभवन आवार, बाणेर रोड,
पुणे ४११ ००७.
**टेलिफोन नंबर: - २५६०८२०२ / ८२०२**

# यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा)

## ई- निविदा सूचना २०२४-२०२६

दुरध्वनी क्रमांक:- ०२०-२५६०८२०२/८१७५

# ई-निविदा सूचना

---

## भाडे तत्वावरील वाहन व्यवस्था २०२४-२०२६

| | | |
|---|---|---|
| अंदाजे उलाढाल रक्कम | - | रूपये ७०.०० लाख (दोन वर्षासाठी) |
| सुरक्षा ठेव | - | ३% (of Estimated cost) |
| बयाणा रक्कम ठेव | - | रुपये १,७०,०००/- |
| ई-निविदा फॉर्मची किंमत | - | रुपये १७०००/- (नापरतावा रक्कम) |
| ई-निविदा फॉर्म भरण्याचा कालावधी | - | दिनांक ०९/०५/२०२४ ते दि. २४/०५/२०२४ |
| ई-निविदा फॉर्म भरण्याची अंतिम तारीख व वेळ | - | दिनांक २४/०५/२०२४ दुपारी ०३.०० वाजता |
| ई-निविदेसाठीची प्री-बीड मिटींग | - | दिनांक १४/०५/२०२४ सकाळी ११:३० वाजता |
| ई-निविदेतील तांत्रिक लिफाफे उघडण्याची तारीख व वेळ | - | दिनांक २८/०५/२०२४ सकाळी ११.०० वाजता |
| दरकराराचा कालावधी | - | २ वर्षे |

**ई-निविदेबाबत थोडक्यात माहिती**:

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) ही महाराष्ट्र शासनाच्या अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणारी महाराष्ट्र शासनाची एक अग्रगण्य स्वायत्त संस्था आहे. यशदामध्ये वेगवेगळया प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. सदर प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये क्षेत्र भेटी, अभ्यास सहली ही आयोजित केल्या जातात. येथे येणारे अधिकारी हे महाराष्ट्र व केंद्र शासनाचे उच्च पदावरील अधिकारी असल्याने त्यांच्यासाठी वेळोवेळी सुसज्ज व सुस्थितीत असलेल्या वाहनांची आवश्यकता भासते. SEDAN, SUV, Innova Crysta, Innova Hycross Hybrid, १७ Seater Urbania तसेच १७ आसनी, २७ आसनी, ३२ आसनी व ४५ आसनी, व Volvo इत्यादी एसी वाहनांचे दरपत्रक निविदादारांनी दराबाबतचा लिफाफा (Priced Bid) - लिफाफा क्र.०२ मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

०२ निविदादारांनी दोन लिफाफा पध्दतीने ऑन लाईन ई-निविदा सादर करणे आवश्यक आहे.

अ) तांत्रिक लिफाफा (Technical Envelop)- लिफाफा क्र.०१

ब) दराबाबतचा लिफाफा (Priced Bid) - लिफाफा क्र.०२

## ०१) **ई-निविदेबाबत सर्वसाधारण सुचना**:

१.१ यशदा, पुणे या स्थायत्त संस्थेमार्फत सन २०२४-२०२६ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी आवश्यतेनुसार भाडयाने वाहन पुरविणे या करिता मा. महासंचालक, यशदा यांच्या वतीने तत्सम कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदारांकडून दर करार करण्याकरिता दिनांक ०९/०५/२०२४ ते दिनांक २४/०५/२०२४ या कालावधीमध्ये ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१.२ सदर ई-निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहे. निविदादारांना ई-निविदा भरण्यासाठी ई-निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०९/०५/२०२४ रोजी दुपारी ०३.०० पासून दिनांक २४/०५/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यत सुरू राहील. वरील कामांची ई-निविदा सूचना निविदादारांच्या माहितीसाठी www.yashada.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१.३ सदर ई-निविदेतील तांत्रिक लिफाफे उघडण्याची दिनांक २८/०५/२०२४ रोजी दुपारी ११.00 वा. असेल.

१.४ सदरील निविदेची फी १७,०००/- (रुपये सतरा हजार फक्त) व बयाणा रक्कम रुपये १,७०,०००/- (रूपये एक लाख सत्तर हजार फक्त) ही https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहे, याची सर्व निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

१.५ ई-निविदा बाबत काही शंका असल्यास वरील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच तांत्रिक मदतीसाठी (०२२-२७५६०१४९) ०१२०—४७११५०८/४००१००२/४००१००५/६२७७७८७ एनआयसी च्या टोल फ्री नंबरवर संपर्क साधावा.

१.६ भारतीय डाक/कुरीयर/हस्तपोहच इ-मेल या मार्गाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

१.७ निविदेतील दर हे लिफाफा क्र. २ उघडल्याच्या तारखेपासून १२० दिवस ग्राह्य राहतील

## १.८ **निविदापुर्व बैठक (Pre-bid Meeting)**:

निविदादारांच्या शंका समाधानासाठी दिनांक १४/०५/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता प्री-बीड मिटींग आयोजित करण्यात येत आहे, निविदादारांनी सदर बैठकीस उपस्थित रहावे. बैठकीमध्ये निविदादाराकडुन विचारण्यात आलेल्या मुद्याबाबत यशदाकडुन स्पटीकरण करण्यात येईल व याबाबतचे इतिवृत्त तयार करण्यात येईल. सदरचे इतिवृत्त ते https://mahatenders.gov.in व www.yashada.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल व हे इतिवृत्त ई-निविदेचा भाग असेल. यानंतर निविदादाराकडुन उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही शंकाचा यशदाकडुन विचार करण्यात येणार नाही.

**भाग अ)    तांत्रिक भाग :**

१.९ **तांत्रिक लिफाफा (Technical Envelop)- लिफाफा क्र.०१**

सदर लिफाफ्यामध्ये निविदादारांनी खाली नमुद करण्यात आलेली योग्य व मोजकीच कागदपत्रे अपलोड करावीत. यामध्ये कोणत्याही कागदपत्रावर दर सादर करण्यात येवु नये. या लिफाफ्यामध्ये दर आढळुन आल्यास सदर निविदादाराची ई-निविदा रद्द करण्यात येइल.

०२. ऑनलाईन लिफाफ्याला "Technical Bid- Envelop No. 01" असे नाव द्यावे. त्यामध्ये खालील तक्त्यामध्ये मागणी करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या सुस्पष्ट दिसतील अशा स्कॅन केलेले प्रती अपलोड करावे.

| अ.क्र. | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|
| १ | ई निविदा फॉर्मची किंमत व बयाणा रक्कम ठेव भरणा केल्याबाबतचा पुरावा म्हणून ई चलनाची प्रत सादर करणे आवश्यक आहे. |
| २ | सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असल्यास MSME नोंदणी प्रमाणपत्राची प्रत जोडण्यात यावी. |
| ३ | वाहन पुरवठादार हे उद्यम आधार किंवा दुकाने व आस्थापना अधिनियम अंतर्गत नोंदणीकृत संस्था म्हणुन दिनांक १ एप्रिल २०२२ रोजी किमान ४ वर्षे पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे, त्याबाबतचा पुरावा म्हणुन संस्था नोंदणी प्रमाणपत्राची प्रत जोडण्यात यावी. |
| ४ | निविदादाराने त्यांच्या लेटरहेडवर निविदादाराचे / एजन्सी / मालकाचे नांव, प्राधिकृत व्यक्तिचे नाव, कार्यालयाचा संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमाक, फॅक्स नंबर, ई-मेल पत्ता इ. बाबतच्या माहितीची प्रत जोडण्यात यावी. **परिशिष्ट- ब** |
| ५ | निविदादार /एजन्सीच्या नावे पॅन कार्ड छायांकित प्रत जोडण्यात यावी. |
| ६ | निविदादार /एजन्सीच्या नावे वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडण्यात यावी. |
| ७ | मागील वर्ष २०२०-२०२१, २०२१-२०२२, २०२२-२०२३ व २०२३-२०२४ यापैकी कोणत्याही दोन वर्षात शासकीय विभाग, शासकीय / निमशासकीय संस्था, खाजगी संस्था यांना एका प्रसंगी किमान २५ वाहने पुरवठा करण्यात आलेबाबतचे संबंधित संस्था यांचेकडुन देण्यात आलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रती जोडण्यात याव्यात. |
| ८ | वर्ष २०२०-२०२१, २०२१-२०२२, २०२२-२०२३ व २०२३-२०२४ या पैकी मागील कोणत्याही तीन वर्षांच्या कालावधीमध्ये वाहने भाड्याने पुरविण्याबाबतची वार्षिक उलाढाल किमान रूपये ४०.०० लाख असल्याबाबतचे सनदी लेखपाल (Chartered Accountant) यांचे लेटरहेडवर UDIN क्रमांकासह प्रमाणपत्र जोडण्यात यावे. (Profit & Loss A/c व Balance Sheet च्या प्रती जोडू नयेत. त्या विचारात घेण्यात येणार नाहीत.) |
| ९ | वर्ष २०२०-२०२१, २०२१-२०२२, २०२२-२०२३ व २०२३-२०२४ या पैकी मागील कोणत्याही तीन वर्षात शासकीय विभाग, शासकीय / निमशासकीय संस्था, खाजगी संस्था अशा किमान ४ संस्थांना समाधानकारकपणे वाहन पुरवठा केल्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (Work Order जोडण्यात येवु नये) |
| १० | वाहन पुरवठा निविदादार यांचे नावे पुणे महाराष्ट्र येथे नोंदणी केलेल्या स्वतःच्या मालकीच्या व्यवसाईक वापराच्या (Transport Vehicles) वेगवेगळया प्रकारच्या किमान ०७ कार व ०४ बस असणे आवश्यक आहे. पुरावा म्हणून वाहन नोंदणी प्रमाणपत्रांच्या व टॅक्स पावतीच्या प्रती जोडण्यात याव्यात. स्वतःच्या मालकीच्या ०४ बस नसल्यास इतर एजन्सीकडून बस पुरविण्याबाबतचे हमीपत्र जोडण्यात यावे. निविदादाराकडे असलेली स्वतःच्या मालकीच्या अथवा संम्मती पत्रामध्ये नमुद करण्यात आलेले बस हे १ जानेवारी २०१९ व इतर अन्य प्रकारची वाहने १ जानेवारी २०२२ नंतर खरेदी केलेली असावीत. पुरावा म्हणुन खरेदीच्या तारखा दर्शविणारी कागदपत्रे जोडण्यात यावीत. |
| ११ | वाहनसेवा पुरवठा करत असलेल्या ग्राहकांच्या कार्यालयाचे पत्ते, व दूरध्वनी क्रमांक याची यादी जोडण्यात यावी. |
| १२ | आटीजीएस बँक तपशील तक्ता. **परिशिष्ट- ई (तांत्रिक लिफाफा)** |
| १३ | ई-निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे निविदाराच्या लेटरहेडवर स्वीकृतीपत्र (Tender terms & Conditions acceptance letter). **परिशिष्ट- उ (तांत्रिक लिफाफा)** |
| १४ | घोषणापत्र **परिशिष्ट — ऊ (तांत्रिक लिफाफा).** |

वरील अ. क्र. ०१ ते १४ येथील सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे आवश्यक असून त्यांची पूर्तता न झाल्यास लिफाफा क्र. २ (Financial Bid) उघडला जाणार नाही.

## लिफाफा क्रमांक २ (Financial Bid)

यामध्ये फक्त परिशिष्ट- 'अ' येथे विहीत नमुन्यामध्ये निविदेच्या दराबाबत माहिती सादर करावी. निविदेच्या परिशिष्ट अ मधील सर्व वाहनांच्या दराचे सर्व रकाने भरणे अनिवार्य आहे.

अ) लिफाफा क्र.१ उघडल्यानंतर आवश्यक दस्तऐवजांची पूर्तता केली असल्याची खात्री केल्यानंतरच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

# ई-निविदाबाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

## <u>सेवांचा दर्जा-</u>

०१. वाहनचालक - वाहन पुरवठादार संस्थेने वाहनासोबत पाठविलेला वाहनचालक चांगली वर्तणूक असलेला गणवेशधारी आणि वाहतूक कायद्यांची तसेच राज्यातील महामार्ग व राज्यमार्गाची माहिती असलेला, वाहन चालविणेचा राज्य परिवाहन विभागांचा वैध परवाना व अन्य आवश्यक ती कागदपत्रे असणारा असावा. वाहन चालकास विहित परवान्यासह किमान तीन वर्षाचा अनुभव असावा. वाहनचालकास मराठी, हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच आवश्यकतेनुसार इंग्रजी भाषेचे ज्ञान असणारा वाहनचालक पुरविणे आवश्यक आहे. वाहनचालकाचे वय ५५ वर्षापेक्षा अधिक नसावे. तसेच The Maharashtra Motor Vehicles Rule १९८९ यामधील सर्व तरतूदीचे काटेकोर पालन व्हावे.

०२. दूरध्वनीचे पाठबळ - संस्थेकडे २४ तास संपर्कासाठी आवश्यक ते पुरेसे दूरध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच संस्थेने विशिष्ट व्यक्तीकडे यशदाशी संपर्क ठेवण्याची जबाबदारी सोपविणे आवश्यक आहे. यशदाचे प्रतिनिधीने किंवा अधिकाऱ्याने केलेले फोन घेणे पुरवठादार संस्थेचे प्रमुखावर अथवा संस्थने प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीवर बंधनकारक राहिल.

०३. वाहनामध्ये- १) मिनरल वॉटर, २) फायरिंग बॉटल, ३) टर्कीश नॅपकीन, ४) टिश्यू पेपर बॉक्स इ. असणे आवश्यक आहे.

०४. यशदाचे कार्यालय अल्प कालावधित दूरध्वनीद्वारे वाहनाची मागणी करु शकेल व अशी मागणी झाल्यानंतर त्वरित वाहन पाठविण्याची व्यवस्था झाली पाहिजे अन्यथा यशदा दुसरीकडून व्यवस्था करुन घेईल व त्यासाठी होणारा जास्तीचा खर्च तसेच यशदा ठरवेल तशी दंडात्मक रक्कम ही संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

०५. विमा व कागदपत्रे - संस्थेची ही जबाबदारी असेल की, वाहनाची व वाहनातील प्रवाशांची (Full Insurance) विम्याची कागदपत्रे गाडीसोबत ठेवावी व विम्याचा पुरावा निविदेसोबत सादर करावा. असा पुरावा सादर न केलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

०६. अपघात हाताळणी - यशदास भाड्याची सेवा पुरवितेवेळी वाहनास किंवा तिऱ्हाईतांचे अपघात होऊन नुकसान झाले तर यशदा या नुकसानीस जबाबदार राहणार नाही. या संबंधीची संपूर्ण खर्च निविदाधारकास सोसावा लागेल. या संदर्भात कोणतीही देणी अथवा न्यायालयीन प्रकरण यास यशदा संस्था बांधिल रहाणार नाही अथवा जबाबदार रहाणार नाही.

०७. वैधानिक जबाबदारी - संस्थेने सेवा पुरविण्यासंबंधिच्या सर्व वैधानिक जबाबदाऱ्यांची पूर्तता करावयाची आहे.

०८. वाहनाची वर्दी दिल्यानंतर वर्दीच्या वेळेपूर्वी दोन तास अगोदर वर्दी रद्द करण्याची सूचना केल्यानंतर सदर वाहनाची वर्दी रद्द समजण्यात यावी आणि ज्या प्रकारच्या वाहनाची मागणी केली आहे त्याच प्रकारचे वाहन पुरविणे बंधनकारक राहील.

०९. वर्दी चालू होण्याअधी व वर्दी संपल्यानंतर वाहने स्वच्छ करणे आवश्यक आहे. वाहने आतील व बाहेरील बाजूनी स्वचछ असणे आवश्यक आहे.

**देयक अदायगीबाबत**

१०. आगाऊ अग्रिम अदायगी यशदा किंवा वाहनात प्रवास करणारे अधिकारी करणार नाही. पुरविलेल्या वाहनांची देयके वाहन पुरवठादार संस्थने प्रत्येक महिन्याचे दहा तारखेपूर्वी यशदा कार्यालयास बिनचुक सादर करावयाची आहेत. सादर केल्या जाणाऱ्या देयकासमावेत वाहनाचा वापर करणाऱ्या अधिकाऱ्याचे स्वाक्षरी असलेली ड्युटी स्लिप्स्, टोलची व इतर पार्कीगची रक्कम अदा केली असल्यास त्याबाबतच्या मूळ पावत्या सादर करणे बंधनकारक राहिल. टोल व इतर पावत्याव्दारे मागणी केलेल्या रकमांच्या पावत्या कागदावर चिकटवून बिलासोबत जोडण्यात याव्यांत. तसेच वापर केलेल्या वाहनाचे सुरुवातीचे व वापर संपलेल्या वेळचे किलोमीटर रिडींग, वापर केलेले कि. मी. तसेच वापर केलेल्या वाहनाचा कालावधी स्पष्टपणे समजेल या पध्दतीने ड्युटी स्लीपवर नोंदविणे बंधनकारक राहील. डयुटी स्लीपवर कि.मी. व वापर कालावधी (वेळ) यामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड मान्य केली जाणार नाही.

११. ड्युटी स्लीपवर वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनामासह तसेच यशदा मध्ये वाहन दाखल झाल्याची दिनांकासह वेळ व सुरूवातीचे कि.मी. तसेच प्रवासाहून वाहन परतल्यानंतर यशदा मध्ये दाखल झाल्याची दिनांकासह वेळ व शेवटचे कि.मी. व इतर नोंदी घेऊन संबंधित वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याची डयुटी स्लीपवर नावासह स्वाक्षरी घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची असेल. तसेच आवश्यकतेनुसार वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१२. पूरविण्यात आलेले वाहन बस साठी १ जानेवारी २०१९ व कारसाठी १ जानेवारी २०२२ पूर्वीच्या मेकचे आढळून आल्यास सदर वर्दीचे देयक अदा करण्यात येणार नाही.

१३. ठेकेदाराकडून पुरविण्यात आलेल्या वाहनात दोष (बंद पडणे / सस्पेशन्स चांगले नसणे/ गाडी आवाज करणे इ.) आढळून आल्यास किंवा वाहन विहीत कालावधीत उपलब्ध न झाल्यास, तसेच वाहन चालकाचे गैरवर्तन आढळून आल्यास त्या वर्दीच्या देयकातून ३०% रक्कम दंड म्हणून कपात करण्यात येईल. याबाबत यशदा कडुन कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१४. प्रवासाचा मार्ग - प्रवास हा शक्य तो जवळच्या मार्गाने करावा. सेवेत असताना वाहन जर नादुरुस्त झाले तर दुसरे वाहन त्वरित पाठविण्याची जबाबदारी संस्थेची राहील. जर बदली वाहनाची व्यवस्था वेळेत केली नाही तर दुसरी व्यवस्था करण्यात येईल व त्यासाठी द्यावी लागणारी किंमत वाहन पुरवठादार संस्थेस द्यावयाच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

१५. निविदा दारांनी दर भरताना वस्तू व सेवा कर वगळून भरावेत सदर कराची रक्कम त्यांना संस्थेमार्फत अदा करण्यात येईल व आवश्यकतेनुसार शासन नियमा प्रमाणे आवश्यकत्या वजाती करण्यात येतील निविदादारनी भरलेले दर निविदा कालावधी पर्यत लागू राहतील. यशदा मार्फत आवश्यकतेनुरूप सेवा कालावधीस मुदतवाढ देण्यात येईल.

१६. ठेकेदाराने टोल/fastag, पार्किंग, परमीट व इतर राज्यांचे कर यांची प्रतिपूर्ती प्रत्यक्षात आकारल्यानुसार देयकाव्दारे यशदास सादर करावी ती यशदाकडून अदा करण्यात येईल. वाहन पुरविताना आवश्यक तेवढे इंधन / टोल/fastag/पार्किंग यासाठी लागणारी रक्कम संबंधित वाहन चालकाकडे असल्याची खात्री करुनच वाहन पुरविण्यात यावे.

१७. अंतर मोजण्याची पध्दत - अंतर मोजण्याकरिता यशदा कार्यालय हे सुरुवात व शेवटचा टप्पा असेल. अंतर व वेळ या पध्दतीने मोजण्यात येईल. पुरवठादाराचे कार्यालयापासून यशदा कार्यालयापर्यंत व वापर झाल्यानंतर यशदा कार्यालयापासून पुरवठादाराचे कार्यालर्यापर्यंतचे किलोमीटर व वापर कालावधी रक्कम अदायगीसाठी गणना केली जाणार नाही.

१८. वाहनाचा एक पूर्ण दिवस रात्री १२.०० वाजता संपेल, परंतू रात्री १२.०० ते पहाटे ३.०० या वेळेत वाहनाचा प्रवास संपल्यास त्यास दुसरा दिवस लागू होणार नाही. रात्री १२.०० ते ३.०० या कलावधीच्या प्रवासाचे भाडे परिशिष्ट अ मधील नमूद केल्याप्रमाणे प्रतितासाने अदा करण्यात येईल. पहाटे ३.०० नंतर दुसरा दिवस सूरु होईल. हीच पध्दत पुढील प्रत्येक दिवसासाठी असेल. वाहनात काही तांत्रिक दोष निर्माण झाल्यास तेवढा कालावधी एकूण कालावधीतून वजा केला जाईल.

१९. वाहन पुरवठादाराच्या सेवेत व्यत्यय आल्यास यशदा मार्फत इतर वाहन पुरवठादारांकडून मिळेल त्या दराने तत्सम सेवा उपलब्ध करुन घेण्यात येईल व त्यापोटी ज्यादा होणाऱ्या भाड्याची वसूली निविदाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

२०. वाहन यशदामध्ये येण्यापुर्वी वाहन तयारीसाठी कोणताही जादा कालावधी (१/२ तास, १ तास) अनुज्ञेय असणार नाही. प्रत्यक्षात वाहन यशदात आल्याची वेळ व प्रवासानंतर वाहन परत यशदात आल्याची वेळच परिगणनेसाठी ग्राहय धरण्यात येईल.

२१. गाडीला अपघात झाल्यास वाहन चालक व आमचे कार्यालयाकडील अधिकारी/ कर्मचारी तसेच त्रयस्थ वाहन अगर व्यक्ती, पादचारी यांना विमा मिळवून देण्याची संपूर्ण जबाबदारी टेंडरदार यांची राहील. यशदासा पुरविण्यात येणारी वाहने सुस्थितीत असणे आवश्यक आहे. प्रवासा दरम्यान पुरेसे इंधन भरणे, वाहनांचा विमा उतरविणे व नुतनीकरण करणे पीयुसी प्रमाणपत्र घेणे व वाहनात काही बिघाड झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. तसेच अपघात, हानी इत्यादी प्रसंगात सर्व जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

२२. वाहन कर्तव्यावर असताना एखादी गाडी बंद पडली, अथवा गाड्यांमध्ये नादुरुस्त / बिघाड झाल्यास तात्काळ, विना विलंब बदली वाहन पुरविण्याची व्यवस्था निविदाधारकाला करावी लागेल अन्यथा त्या दिवसाचे भाडे अदा करण्यात येणार नाही.

२३. प्रवास करते वेळी लागणाऱ्या वाहनांच्या व चालकांच्या सर्व कायदेशीर कागदपत्रांची ठेकेदारामार्फत पूर्तता केलेली असावी उदाहरणार्थ वाहनातील प्रवाशांसह वाहन विमा इ. प्रवासादरम्यान काही कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास निविदाधारक / एजन्सी त्यास पूर्णपणे जबाबदार राहील. वाहनासंबंधीची सर्व कागदपत्रे संबंधित वाहनचालकासोबत असतील. भाड्याने द्यावयाच्या वाहनासाठी मोटरवाहन कायद्यातील तरतूदीनुसार सर्व निकश हे वाहनाबाबत परिपूर्ण असावेत.

**<u>इतर अटी व शर्ती</u>**

२४. ई-निविदा दोन लिफाफे पध्दतीने ऑनलाईन (online) सादर करणे आवश्यक आहे. निविदाकाराने तांत्रीक माहिती आणि आर्थिक माहिती स्वतंत्रपणे ऑनलाईन भरणे आवश्यक राहील.

२५. सर्व प्रथम विहित वेळेत लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल व निविदेत नमूद केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर केले आहेत याबाबत खात्री करून घेतल्यानंतरच निविदेतील दराबाबतचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

२६. आवश्यक कागदपत्रे/ प्रमाणपत्रे व निविदा दर सादर केल्याचे आढळून न आल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येईल. सादर केलेली कागदपत्रे / प्रमाणपत्रे चुकीची किंवा खोटी आढळल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

२७.

अ) दराचा लिफाफा परिशिष्ट अ उघडल्यानंतर ज्या निविदादारांचे ज्या वाहनाचे दर ज्या बाबीसाठी न्यूनतम आहेत त्या त्या वाहनांचा ठेका त्या त्या बाबीसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदादाराकडे सोपविण्यात येईल.

ब) एका वेळी एकापेक्षा जास्त वाहन पुरवठादार नेमण्याचा अथवा वाहतूकदार यांचे पॅनल नेमण्याचा अधिकार यशदा राखून ठेवत आहे. त्यामुळे किमान व्यवसाय देण्याची हमी दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

क) न्यूनतम दर प्राप्त झालेल्या निविदादाराने न्यूनतम दराने सेवा देण्यास असमर्थता दर्शविल्यास संबंधीत निविदादाराची सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल व सदर वाहनासाठी त्यानंतर न्यूनतम दर असणाऱ्या निविदादारास वाहनांचा ठेका देण्यात येईल तसेच निविदादारास संस्थेच्या काळया यादीमध्ये समाविष्ट करण्याचे अधिकार मा. महासंचालक यशदा यांच्याकडे राहतील.

२८. यशदाकडून मान्य करण्यात आलेला दर यशदातील सर्व विभागांसाठी व कार्यालयांसाठी लागू राहतील.

२९. मान्य झालेल्या दरानुसार व यशदाच्या मागणीनुसार वाहनांचा वर्ष २०२२-२४ या दोन वर्षासाठी पुरवठा करणे आपणावर बंधनकारक असेल. कराराचा कालावधी दर करार झाल्यापासून दोन वर्षाचा राहील. सेवा समाधानकारक असल्यास आवश्यकते प्रमाणे पुढील दोन वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. महासंचालक, यशदा यांचेकडे राहतील.

३०. सदर कामाचा ठेका मंजूर झाल्यास त्याबाबतच्या कराराचा मसुदा यशदामधून घेऊन तो शासन नियमानुसार आवश्यक रकमेच्या शासकीय मुद्रांक पेपरवर तयार करून द्यावा लागेल. मुद्रांक पेपरचा तसेच निविदेचा खर्च ठेकेदारास करावा लागेल.

३१. करार मुल्याच्या ३% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून (बिनव्याजी) ठेकेदाराने यशदाकडे राष्ट्रकृत बँकेचा धनाकर्ष मा. महासंचालक, यशदा यांचे नावे भरणा करणे आवश्यक आहे. कराराची मुदत संपल्यानंतर फक्त भरणा करणेत आलेली (व्याज वगळून) रक्कम ठेकेदारास परत करण्यात येईल.

३२. ठेकेदारास कार्यालयाकडून वाहनाची वर्दी (बसेस साठी किमान ०२ दिवस आधी व इतर वाहनांसाठी किमान ०२ तास अगोदर) देण्यात येईल.

३३. वाहनासाठी वर्दी मिळाल्यानंतर वाहन विहीत वेळेत विहीत पत्त्यावर पोहोचणे आवश्यक आहे. वाहनासंबंधीची सर्व कागदपत्रे संबंधित वाहनचालकासोबत असणे आवश्यक राहील.

३४. निविदाधारकाने निविदा मंजूर होवून करारनामा केल्यांनतर पुरविण्यात येणारी सर्व वाहने बस साठी १ जानेवारी २०१७ व कारसाठी १ जानेवारी २०२२ च्या नंतरच्या मेकचे असलेली पुरवठा बंधनकारक राहील. तसेच वाहने प्रत्यक्ष भाड्याने लावणे पूर्वी प्रत्येक वाहनाच्या सुस्थितीबाबत तपासणी, आसन क्षमता, वाहनांची आर. सी. / टी. सी., वाहन इन्श्युरन्स, वाहन परमीट, पी.यु.सी, फिटनेस सर्टिफिकेट, वाहनचालकाचे परवाना वैधता इत्यादी बाबींची पडताळणी संबंधित कंत्राटदाराने करावयाची आहे. तसेच वाहनामध्ये GPS Tracking सुविधा असणे आवश्यक आहे. देयकासोबत आवश्यकतेनूसार GPS Tracking Report जोडणे आवश्यक आहे.

३५. निविदे सोबत जोडलेल्या लिफाफा ०२ मधील परिशिष्ट 'अ' (दराबाबतचा लिफाफा) मध्ये नमूद केलेली वाहने उपलब्ध करुन देण्याबाबतचा तपशीलासमोर प्रत्येक बाबीसाठी दर नमूद करणे बंधनकारक राहील.

३६. वाहनाच्या दराची निविदा भरताना दर परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केल्यानुसार भरावे. त्याव्यतिरिक्त कुठलेही भत्ते देय रहाणार नाही. हे कार्यालय फक्त ठरलेल्या भाड्याची अदायगी व जीएसटी अदा करेल. इतर सर्व जबाबदाऱ्या वाहने पुरविणाऱ्या पुरवठादाराच्या असतील.

३७. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांकः भांखस-२०१४/ प्र. क्र. ८२/ भाग-III/ उद्योग-४ दिनांक- ०१ डिसेंबर, २०१६, ६.८ मधील परिशिष्ट ८ नुसार सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघू उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.

३८. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांकः भांखस-२०१४/ प्र. क्र. ८२/ भाग-III/ उद्योग-४ दिनांक- ०१ डिसेंबर, २०१६, मधील परिशिष्ट ८ नुसार निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

३९. करार कालावधीमध्ये कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास संस्थेमार्फत ठेका रद्द करण्याची ३० दिवसांची नोटीस देण्यात येईल, त्याच प्रमाणे कंत्राटदारामार्फत ठेका रद्द करावयाचा झाल्यास करार सुरु झाल्यापासून ०६ महिनेनंतर कंत्राटदाराने संस्थेला ९० दिवसांची आगाऊ नोटीस देणे बंधनकारक राहील. यासाठी कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार नाही.

४०. जरी यशदास नियमित वाहनांची आवश्यकता आहे तरी सूचना न देता अशी सेवा न घेण्याचे संपूर्ण अधिकार यशदास राहतील. याबाबत वाहन पुरवठादार यांची कोणतीही तक्रार ग्राहय मानली जाणार नाही.

४१. यशदाच्या गरजेनुसार तसेच वाहन पुरवठादाराच्या सेवा समाधानकारक असल्यास मुळे करारातील आहे त्याच अटी व शर्तीसह करारास पुढील १ ते २ वर्ष अथवा महासंचालक यशदा यांना आवश्यक वाटेल तेवढया कालावधीसाठी करारास मुदतवाढ देणे अथवा न देणे यांचे संपूर्ण अधिकार मा. महासंचालक यशदा यांचे राहतील. मुदतवाढ देण्यात आल्यास त्यानुसार वाहने पुरविण्याची ठेकेदाराची जबाबदारी राहील.

४२. सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचा वाद उभ्दवल्यास मा. महासंचालक यशदा यांचे निर्णय अंतिम राहतील.

४३. या करारास पुणे शहारापुरतेच न्यायाधिकार कक्ष (लीगल ज्यूरिस्डिक्शन) मर्यादित राहील.

४४. एक अथवा सर्व ई-निविदा अंशतः अथवा पुर्णता स्विकारणे अथवा नाकारणे किंवा अंशतः अथवा पुर्णता कोणत्याही कारणा शिवाय रद्द करण्याचे अधिकार मा. महासंचालक यशदा यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

४५. मोटार वाहन कायदा १९८८ मधील तरतूदीप्रमाणे सर्व वाहनाची वैध, योग्यता, प्रमाणपत्रे, वाहनांचा (Compresive) विमा, फिटनेस सर्टिफिकेट इत्यादी बाबतची कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

४६. मुंबई मोटार वाहन कर कायद्याप्रमाणे वाहनांचा कर भरलेला असावा.

४७. या व्यतिरिक्त ठेकेदारांच्या कोणत्याही अटी व शर्ती मंजूर करण्यात येणार नाहीत.

४८. निविदा फॉर्म पूर्ण न भरल्यास तसेच त्यात खाडाखोड अथवा उपरिलेखन असल्यास व त्याठिकाणी निविदाकाराने स्वाक्षरी केले नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

# परिशिष्ट- ब (तांत्रिक लिफाफा)

**प्रति,**
**मा. महासंचालक**
**यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा)**
**राजभवन आवार, बाणेर रोड,**
**पुणे ४११ ००७.**

**विषयः भाडे पद्धतीने वाहन सेवा पुरविण्याकरिताच्या निविदा**

महोदय,

खाली सही करणाराने उपरोक्त विषयसंबंधातील निविदा, दस्तऐवज पूर्णपणे वाचले असून मी/माझी संस्था आपण यशदासाठी वाहने भाडे पध्दतीने घेण्यासाठी ई-निविदेमध्ये निर्धारित केलेल्या अटी व शर्ती आम्हास मान्य आहेत. सदर अटी व शर्तीनुसार भाडे तत्वावरील वाहनांची सेवा पुरविण्याकरिता तयार आहे.

संपर्काचा तपशीलः

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | |
| २ | संस्थेचा पूर्ण पत्ता | |
| ३ | या निविदेसंबंधी ज्या व्यक्तीशी संपर्क साधावयाचा आहे त्यांचे नाव | |
| ४ | या निविदेसंबंधी ज्या व्यक्तीशी संपर्क साधावयाचा आहे त्यांचे पदनाम व पूर्ण पत्ता | |
| ५ | पॅन व सेवाकराचा तपशील | |
| ६ | एस.टी.डी क्रमांकासह दूरध्वनी क्रमांक | |
| ७ | या निविदेसंबंधी ज्या व्यक्तीशी संपर्क साधावयाचा आहे त्यांचा ई-मेल | |

खालीलप्रमाणे निविदा दस्तैवज जोडलेले आहेत.

१. परिशिष्ट क ते परिशिष्ट ऊ
२. परिशिष्ट ड- प्रतिज्ञापत्र
३. परिशिष्ट इ- अधिकार पत्र- निविदेसंबंधी संस्थेचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी व सर्व व्यवहार पूर्ण करण्यासाठी दिलेले अधिकारपत्र.

आपला विश्वासू,
अधिकृत व्यक्तिची स्वाक्षरी
नाव व संपर्क क्रमांक

दिनांक
ठिकाण व पदनाम
व्यवसायाचा पत्ता व मोहोर

## परिशिष्ट- क (तांत्रिक लिफाफा)

## पुर्वानुभव

प्रमाणित करण्यात येते की, आमच्या संस्थेने खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या संस्थांना वाहनसेवा पुरविण्यात आलेल्या असून त्याचा खालील तक्त्यात दिलेला तपशील खरा व बरोबर आहे.

| अ. क्र. | शासनातील / निमशासकीय / खाजगी क्षेत्रांतील संस्थांची नावने व पूर्ण पत्ता व तेथील संपर्क व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक | पुरविलेल्या वाहनांचा प्रकार | वार्षिक भाड्याची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |
| ६. | | | |
| ७. | | | |
| ८. | | | |
| ९. | | | |
| १०. | | | |
| ११. | | | |
| १२. | | | |
| १३. | | | |
| १४. | | | |
| १५ | | | |

| | |
|---|---|
| दिनांक<br>ठिकाण व पदनाम<br>व्यवसायाचा पत्ता व मोहोर | आपला विश्वासू,<br>अधिकृत व्यक्तिची स्वाक्षरी<br>व नाव व संपर्क क्रमांक |

# <u>परिशिष्ट- ड (तांत्रिक लिफाफा)</u>
# प्रतिज्ञापत्र

**(सदरचे प्रतिज्ञापत्र सक्षम अधिकारी यांचे स्वाक्षरीने संस्थेच्या लेटरहेरवर)**

मी ------------------------------------------------, राहणार ---------------------------------------, वय वर्षे ----------, सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो की,

१. मी / माझ्या संस्थेचे अन्य भागधारक / संचालक अशा कोणत्याही दावा / खटल्यात गुंतलेलो नाही की, ज्याचा परिणाम निविदेप्रमाणे सेवा देणेवर होईल.

२. आमच्या संस्थेच्या समावेश केंद्र / राज्य शासकीय खाते, राज्य / केंद्र शासन पुरस्कृत संस्थांकडे काळ्या यादीत नाही.

उपरोक्त माहिती खरी व वस्तूनिष्ठ आहे. ती खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्याचे आढळून आल्यास मी / माझी संस्था भारतीय दंडविधानाच्या तरतूदींनुसार शिक्षेस पात्र ठरु याची मला पूर्णपणे जाणीव आहे.

| | |
|---|---|
| दिनांक<br>ठिकाण | प्रतिज्ञाधारक<br>(अधिकृत प्रतिनिधीची नाव व स्वाक्षरी)<br>संपर्क क्रमांक |

# परिशिष्ट- इ (तांत्रिक लिफाफा)
## अधिकारपत्र
### (संस्थेच्या लेटरहेरवर)

मी, ----------------------------------------------, (पदनाम) याद्वारे श्री. श्रीमती ---------------------------- वय वर्षे- ---------, राहणार ---------------------------------- यांना माझी संस्था ------------------------------- हीच्या वतीने यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे यांच्या **वाहने भाड्याने पुरवठा करण्यासाठीच्या** निविदेकरिता, निविदेतील विविध कागदपत्रे, प्रतिज्ञापत्र प्रमाणित करण्यासाठी तसेच निविदेसंबंधातील सभा / बैठकांस उपस्थित राहून माझ्या संस्थेच्या वतीने निर्णय घेण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

श्री. ------------------------------------------ यांच्या सहीचा नमुना खालीलप्रमाणे आहे.

----------------------------------------------

----------------------------------------------

(स्वाक्षरी)
नाव-----------------
पदनाम--------------

# परिशिष्ट- ई (तांत्रिक लिफाफा)

**Personal & Bank Details for RTGS Purpose**

| Sr.No | **Personal Details -** | |
|---|---|---|
| 1. | NAME OF THE COMPITANT PERSON & AGENCY | |
| 2. | ADDRESS OF THE AGENCY | |
| 3. | CONTACT DETAILS | 1) LANDLINE NO. |
| | | 2) MOBILE NO. |
| | | 3) E-Mail ID |
| 4. | PAN.NO | |
| 5. | GST NO.- | |
| **Bank Details -** | | |
| 1. | NAME OF THE AGENCY FOR RTGS | |
| 2. | NAME OF THE BANK | |
| 3. | CITY OF THE BANK | |
| 4. | ACCOUNT NO. | |
| 5. | ACCOUNT TYPE | |
| 6. | BRANCH CODE | |
| 7. | ADDRESS OF THE BRANCH | |
| 8. | IFSC CODE | |
| 9. | MICR NO. | |

(Signature of Authorized Person)

## परिशिष्ट- उ (तांत्रिक लिफाफा)

Date:

To,
Director General,
YASHADA,
Rajbhavan Complex, Baner Road,
Pune- 411 007.

**Subject:- Terms & Conditions acceptance Letter.**

**Reference:-**

Respected Sir,
We agree to supply out L1 items according to Tender Terms and Conditions as mentioned in the above Reference Tender.

Thank You,

Yours Faithfully,
For (Company Name)

# <u>परिशिष्ट- ऊ (तांत्रिक लिफाफा)</u>
## घोषणापत्र
### (संस्थेच्या लेटरहेरवर)

मी, ---------------------------------------------, (पदनाम) याद्वारे असे घोषित करतो की, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे यांच्या **वाहने भाड्याने पुरवठा करण्यासाठीच्या** निविदेकरिता, निविदेतील विविध कागदपत्रे, प्रतिज्ञापत्र व दिलेली माहिती पूर्णपणे खरी व बरोबर असून त्यामध्ये तफावत अथवा त्रुटी असल्यास कोणत्याही स्तरावर माझी ई-निविदा रद्द होईल या मी होणाऱ्या कार्यवाहीस पात्र असेल. याची मला पूर्ण जाणिव आहे.

(स्वाक्षरी)
नाव-----------------
पदनाम--------------